**कृपया प्रसिध्दीसाठी** **28 जानेवारी 2013**

## श्री.राम नाईक, माजी पेट्रोलियम मंत्री आणि भाजपा नेते यांनी 28 जानेवारी 2013 रोजी मुंबई येथे पत्रकार परिषदेत वितरीत केलेले निवेदन

### *डिझेलची दरवाढ म्हणजे मच्छिमारांचे बळी घेणारी सुनामी - राम नाईक*

**मुंबई, सोमवार :** ''गेल्या दोन -तीन महिन्यांतील स्वयंपाकाचा गॅस, डिझेल, पेट्रोल यांच्या दरवाढीमुळे देशाची आर्थिक अराजकतेकडे वाटचाल सुरु असून मोठयाप्रमाणावर डिझेल खरेदी करणा-यांमध्ये 18 जानेवारी रोजी मच्छिमारांचा समावेश करुन प्रतिलिटर रु.53.21 वरुन रु.64.11 म्हणजेच रु.10.90 ची केलेली दरवाढ म्हणजे मच्छिमारांचे जीवन उदध्वस्त करणारी सुनामीच आहे. महमद तुघलकालाही लाजवेल असा हा निर्णय पेट्रोलियम मंत्री श्री.विरप्पा मोईली यांची वैचारिक दिवाळखोरी स्पष्ट करणारा आहे'', अशी प्रतिक्रिया माजी पेट्रोलियम मंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे नेते श्री.राम नाईक यांनी व्यक्त केली. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

''गेल्या आठवडयात पेट्रोलियम मंत्र्यांनी डिझेल ग्राहकांची सरकारी तेल कंपन्यांच्या पेट्रोल पंपावरील ग्राहक आणि मोठ्या प्रमाणात डिझेल घेणारे ग्राहक (बल्क परचेसर्स) अशी विभागणी केली असून पेट्रोल पंपावरील ग्राहकांच्या डिझेलमध्ये प्रतिलिटर 54 पैसे वाढ केली, तर मोठ्या ग्राहकांच्यासाठी प्रतिलिटर रु.10.90 इतकी अभूतपूर्व वाढ केली आहे. त्या वर्गीकरणात रेल्वे, राज्य परिवहन मंडळे, संरक्षण मंत्रालय यांच्याबरोबरच मच्छिमारांचाही समावेश करण्यात आला आहे. रेल्वे, परिवहन मंडळे, संरक्षण मंत्रालयाच्या वाहनांना लागणारे डिझेल हे एका मालकाच्या अनेक वाहनांना लागणारे आहे. मच्छिमारांची परिस्थिती तशी नसून प्रत्येक बोटीचा स्वतंत्र मालक असतो. मच्छिमारांच्या सहकारी संस्थांना पेट्रोल कंपन्या डिझेल पुरवित असल्या तरी ते कोणा एका ग्राहकांसाठी नव्हे तर वेगवेगळ्या सदस्य मच्छिमारांसाठी असते. उदाहरणार्थ महाराष्ट्रातील सहा सागरी जिल्हयात 10,330 बोटी असून त्यांचे मालक वेगवेगळे आहेत. त्यामुळे त्यांना बल्क पर्चेसर्स वर्गात समावेश करणे अन्यायाचे आहे. समुद्रात वाढलेल्या प्रदूषणामुळे मासे मिळणे कमी झाले आहे, त्यामुळे दूर अंतरावर मच्छिमारी करण्यासाठी जावे लागत असल्यामुळे मुदलातच सध्या मच्छिमारांना डिझेलही जास्त लागते. अशा परिस्थितीत डिझेलचा दर रु.10.90 ने वाढविणे म्हणजे दुष्काळात तेरावा महिनाच ठरतो आहे. त्यामुळे मच्छिमारांचे वर्गीकरण बदलून त्यांना पूर्वीप्रमाणेच योग्य दराने डिझेल दिले पाहिजे. मच्छिमारांनी वाढीव दरात डिझेल खरेदी न करण्याच्या घेतलेल्या निर्णयाला भाजपाचा पाठिंबा आहे. परंतु हे आंदोलन असेच चालू राहिले तर मच्छिमारांच्यावर उपासमारीची वेळ येईल तसेच मासे खाणा-या ग्राहकांच्यावरही अन्याय होईल'', असेही श्री.राम नाईक म्हणाले.

‘‘काँग्रेस सरकारचे एकाच वस्तूसाठी दोन किंमती - दुहेरी किंमत धोरण अव्यवहार्य आहे, इतकेच नव्हे तर भ्रष्टाचार वाढविणारे आहे. उदाहरणार्थ राज्य परिवहन मंडळाच्या बस गाडया तेल कंपन्यांच्या पेट्रोल पंपावर गेल्या तर त्यांना डिझेल नाकारता येणार नाही. तिथे ते कमी किंमतीत मिळेल पण बल्क परचेसर्स पध्दतीनुसार महाग पडेल. राज्य परिवहन मंडळे आधीच तोटयात चालतात त्यांच्या खर्चात वाढ झाल्यामुळे ती अधिकच तोटयात जातील तर खासगी आरामदायी (लक्झरी) बस गाडयांना कमी दरात डिझेल मिळून त्यांचा फायदा होईल. साखर कारखानांन्या दिलेल्या पंपावरही जास्तीच्या दराने डिझेल मिळणार असल्याने त्यांचेही आर्थिक नुकसान होईल’’, असे प्रतिपादनही श्री.राम नाईक यांनी केले.

रेल्वेवरही या निर्णयाचा परिणाम होणार आहे असे सांगून श्री.राम नाईक म्हणाले,‘‘रेल्वेमंत्री श्री.पवनकुमार बन्सल यांनी 9 जानेवारी 2013 रोजी प्रवासी भाडयात जबरदस्त वाढ जाहीर केली. त्याची अंमलबजावणी 21 जानेवारीपासून सुरु झाली आहे. ही भाडेवाढ करताना फेब्रुवारीच्या बजेटमध्ये भाडेवाढ करणार नाही अशी घोषणा त्यांनी केली होती. रेल्वेसाठी प्रतिलिटर रु.10.90 अशी डिझेलच्या दरात वाढ झाली असताना ते आता त्यांचा शब्द कसा पाळणार याचाही त्यांनी खुलासा केला पाहिजे.’’

‘‘तात्पर्य दुहेरी किंमतीचे हे धोरण अव्यवहार्य असून आर्थिक अराजकता वाढविणारे असल्याने ते रद्दच केले पाहिजे’’ अशी मागणीही शेवटी श्री.राम नाईक यांनी केली.

**(कार्यालय सचिव)**